निशाणी क्र. १८/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - अदिती अभिषेक दर्गे, |
| वय | - २२ वर्षे, |
| व्यवसाय | - शिक्षण, |
| राहणार | - सावरोली, ता. खालापूर, जि. रायगड. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी सावरोली येथे माझ्या कुटूंबासह राहण्यास आहे. मी सध्या एम.बी.ए. चे शिक्षण घेत आहे. माझे वडील ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करतात. मी आरोपीला ओळखते. आरोपी आमच्याच गावामध्ये राहण्यास आहे. दि. १९/११/२०२४ रोजी माझ्या वडीलांच्या ऑफिसच्या जवळ जावून आरोपीने माझ्या वडीलांना शिवीगाळ केली होती. त्याबाबत माझ्या वडीलांनी खालापूर पोलीस स्टेशन येथे आरोपी विरुध्द तक्रार दिली होती. दि. २०/११/२०२४ रोजी दुपारी ०२:०० वा. च्या सुमारास मी मतदान करण्यासाठी सावरोली येथील शाळेत गेले होते. मतदान करुन घरी येत असताना सावरोली गावातील भैरवनाथ मंदीरासमोर, चौकात आरोपी बसला होता. त्यावेळी मी मतदान करुन घरी येत असताना तो माझ्या पाठीमागे घराजवळ आला व मला तुला व तुझ्या वडीलांना बघून घेतो, तुझे खुप सारी लफडी आहेत हे मला माहिती आहे, तु कोणाखाली झोपतेस हे मी गावामध्ये सर्वांना सांगतो असे बोलून आरोपी माझ्या अंगावर धावून आला. त्यामुळे मी घाबरुन घरामध्ये परत गेले. त्यानंतर माझे वडील घरी आले. त्यावेळी मी झालेला सर्व प्रकार माझे वडील अभिषेक दर्गे तसेच माझे काका कुशाल दर्गे यांना सांगितला. त्यानंतर माझे काका व वडील हे आरोपीला विचारण्यासाठी गेले असता तो त्यांना म्हणाला की, तुझ्या मुलीची सर्व लफडी गावामध्ये सर्वांना सांगतो असे म्हणून त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर मी आरोपी विरुध्द खालापूर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. आता मला दाखवण्यात आलेला माझा जबाब

तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. जबाबास **निशाणी १९** देण्यात आली. प्रथम खबर अहवालाच्या प्रतीस **निशाणी २०** देण्यात आली. दि. २१/११/२०२४ रोजी पोलीस आमच्या गावामध्ये पंचनाम्यासाठी आले होते. त्यावेळी मी पोलीसांना ज्या ठिकाणी घटना घडली होती ते ठिकाण दाखवले व झालेली घटना सांगितली. पोलीस त्यावेळी सकाळी ११:१५ वा. च्या सुमारास आले होते. पंचनाम्याच्या वेळी पोलीसांनी मोजमाप घेतले तसेच नकाशा काढला. पंचनाम्याच्या वेळी पोलीसांनी फोटो देखील काढले होते. आरोपीला पाहील्यास ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. सोमनाथ दळवी यांचेमार्फत सुरु...</u>**

२) माझे वडील महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचे काम करतात किंवा कसे याची मला माहिती नाही. माझ्या वडीलांचे सावरोली गावाशेजारी असणा-या टाटा स्टील कंपनी मध्ये ट्रान्सपोर्टचे कॉन्ट्रॅक्ट आहेत किंवा कसे याची मला माहिती नाही. दि. १९/११/२०२४ रोजी आरोपीचा व माझ्या वडीलांचा वाद कशावरुन झाला होता हे मला माहित नाही. सावरोली हे गाव किती लोकवस्तीचे असेल हे मला सांगता येणार नाही. ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी जिल्हा परीषदेचे मतदान होते. मला माझे घर ते मतदान केंद्र यामधील अंतर किती असेल हे सांगता येणार नाही. मी मतदान करण्यासाठी जात असताना मतदान कक्षाजवळ पोलीस बंदोबस्त होता. मी मतदान करण्यासाठी जात असताना एकटीच होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे आई-वडील, भाउ, काका-काकी हे माझ्यासोबत नव्हते. आमच्या घरासमोर असणा-या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून मतदान केंद्र यामधील अंतर किती असेल हे मला सांगता येणार नाही. घरापासून भैरवनाथ मंदीर हे अंतर किती असेल हे मला सांगता येणार नाही. घटना घडल्यानंतर दोन तासांनी मी खालापूर पोलीस स्टेशनला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या बाहेर अंगणामध्ये व आजुबाजूला सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत.

साक्षीदार स्वतःहून सांगते की, ते घटनेनंतर लावण्यात आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराला चारही बाजुंनी वॉल कंपाउंड केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, भैरवनाथ मंदीरामध्ये ग्रामपंचायत मार्फत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भैरवनाथ मंदीर आमच्या घराच्या एकदम जवळपास आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या काकी ग्रामपंचायत सदस्य आहेत. माझ्या वडीलांच्या ट्रान्सपोर्टच्या व्यवसायामुळे माझ्या वडीलांचे ग्रामपंचायत मधील लोकांशी तसेच पोलीसांशी चांगले संबंध आहेत किंवा कसे याबाबत मी काहीही सांगू शकत नाही. पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळावर मी, माझी बहीण अनन्या, माझे वडील, दोन पंच आणि दोन पोलीस असे हजर होतो. मला पंचांची नावे सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पंच आमच्या गावातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंच आमचे नातेवाईक आहेत. पंच माझ्या वडीलांचे ओळखीचे आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी घटना घडली त्यावेळी माझे वडील घरी होते की घराच्या बाहेर होते हे मला माहित नाही. ज्यावेळी मी आरोपीला भैरवनाथ मंदीराजवळ पाहीले होते त्यावेळी त्याच्यासोबत इतरही लोक होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी मतदान करण्यासाठी गेले त्यावेळी आरोपी माझ्या पाठीमागे आला नव्हता. मला घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घरामध्ये गेल्यानंतर विचार विनीमय केल्यानंतर आम्ही फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे व आरोपीचे फार पुर्वीपासून वाद चालू आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत निवडणुकीच्या वेळी देखील ज्या वेळी माझी काकी निवडणुकीला उभी होती त्यावेळी देखील आरोपीचे व माझे वडील व काका यांचे वाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला तुला व तुझ्या बापाला बघून घेतो, तुझी कोणासोबत लफडी आहेत हे मला माहित आहे, तु कोणाखाली झोपतेस हे मी गावामध्ये सर्वांना सांगतो व तुझी बदनामी करतो असे बोलून माझ्या अंगावर धावून आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझे वडील व काका आरोपीला विचारण्यासाठी गेले असता आरोपी तुझ्या मुलीची सर्व लफडी गावामध्ये सर्वांना सांगतो व

तुझी बदनामी करतो असे म्हणून त्याने माझे वडील व काका यांना शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.10 17:14:33 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - १०/०३/२०२६